- प्रेस नोट -

दि. २१/१०/२०२६

पंतनगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.१९/१०/२०२६ रोजी २३:४५ वा. ते २०/१०/२०२६ रोजी ००.१० वा. च्या दरम्यान फिर्यादी राहुल शिवशंकर सिंह, वय-२६ वर्षे, धंदा- आचारी, रा.ठी. कामराज नगर, घाटकोपर पुर्व, मुंबई हे व त्यांचा मित्र अफताब सलीम शेख व त्यांच्या परीसरात राहणारा ऋषी होगे असे गरभा पाहण्याकामी जुना आर.टी.ओ ऑफिस समोर गेले असताना फिर्यादींच्या परिसरात राहणारे अटक आरोपी क्र.०१(वय-२४ वर्षे), अटक आरोपी क्र.०२(वय-२६ वर्षे), अटक आरोपी क्र.०३(वय-२५ वर्षे) यांनी फिर्यादींना व फिर्यादींचा मित्र अफताब यास त्यांनी त्यांचे विरोधात पुर्वी केलेल्या तक्रारीचा राग मनात धरून फिर्यादींना शिवीगाळ केली व लाथाबुक्याने मारहाण केली. तसेच अटक आरोपी क्र. ०२ याने त्याच्या जवळील धारदार चाकुने फिर्यादींच्या डोक्यावर मागच्या बाजुस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने वार केला व त्यानंतर तोच चाकु अटक आरोपी क्र.०१ याने अटक आरोपी क्र.०२ च्या हातातुन खेचुन घेवुन तो फिर्यादीचा मित्र अफताब यांस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या छातीवर डाव्या बाजुस खुपसुन फिर्यादींस व त्याच्या मित्रास गंभीर जखमी केले म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. २०/१०/२०२६ रोजी गु.र.क्र. ८४९/२६, कलम १०९, ११८(२), ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
